ePaper

## राज्यातील मंत्री गुन्हेगारांना सोबत घेऊन प्रचार करत आहेत : रुपाली पाटील



|| वर्ष - 6 | अंक - 302 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- पुण्यात हे असलं खपवून घेणार नाही
- शिंदे-फडणवीस सरकार ठेवणार बॉलिवूडवर अंकुश
- निवडणूक यंत्रणा हॅक करण्यासाठी इस्त्रायली हॅकर्सचा वापर?

www.mahaenews.com | शुक्रवार , दि. 17 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# राष्ट्रवादीची लवंगी, तर भाजपाचा सुतळी बॉम्ब!

## भाजपाच्या तुषार कामठेंचा राजीनामा : राष्ट्रवादीच्या शेखर ओव्हाळांचा थेट प्रवेशच

। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।

**चिंचवडमधील राजकीय सत्तासंघर्षाची 'लिटमस टेस्ट' असलेल्या चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपामधील नाराज माजी नगरसेवक तुषार कामठे यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. कामठे राष्ट्रवादीत प्रवेश करणार, अशी चर्चा आहे. त्यामुळे राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीला भाजपावर कुरघोडी केल्याचा अविर्भाव होता. कामठे यांच्या राजीनाम्यामुळे भाजपला अस्थिर करण्याचा प्रयत्न यशस्वी होत असतानाच भाजपने पलटवार केला. राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक शेखर ओव्हाळ यांचा थेट प्रवेश घडवून आणला आणि राष्ट्रवादीची हवा काढून घेतली. त्यामुळे "राष्ट्रवादीने लवंगी पेटवली. तर भाजपाने सुतळी बॉम्ब फोडला.." अशी चर्चा सर्वसामान्य चिंचवडकरांमध्ये सुरू झाली आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक शेखर ओव्हाळ यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. ओव्हाळ यांनी 2017 च्या महापालिका निवडणुकीवेळी भाजपामध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर 21 एप्रिल 2019 रोजी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. आता पोटनिवडणुकीच्या धामधूमीत पुन्हा भाजपामध्ये प्रवेश केला आहे. तत्पूर्वी, भाजपाचे नाराज नगरसेवक तुषार कामठे यांनी भाजपाच्या नगरसेवकपदाचा राजीनामा काही महिन्यांपूर्वी दिला होता. त्यानंतर आता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिली आहे.

ऐन पोटनिवडणुकीच्या तोंडावर कामठे यांचा राजीनामा भाजपाच्या जिव्हारी लागणार, यामुळे राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. तसेच, आगामी दोन-तीन दिवसांत कामठे राष्ट्रवादीत प्रवेश करतील, असा दावाही केला जात आहे. कामठेंच्या नाराजीच्या रुपाने पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीचा माहोल उंचवला होता. मात्र, तो अल्पकाळाचा ठरला.

दुसऱ्याच दिवशी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक शेखर ओव्हाळ यांनी भाजपात प्रवेश केला. राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे निकटवर्ती म्हणून शेखर ओव्हाळ यांची ओळख आहे. त्यामुळे चिंचवड मतदारसंघातील पुनावळे, किवळे, रावेत भागात भाजपाची ताकद आणखी वाढली आहे, असा दावा भाजपाकडून केला जातो.



### अजित पवारांसमोर आव्हान...

» राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांना चिंचवड शहर कळलेच नाही, अशी टीका अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी केली होती. वास्तविक, चिंचवड विधानसभा निवडणूक दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर अल्पावधीत लागली आहे. या निवडणुकीचा कालावधी अवघा वर्षभराचा राहिला आहे. त्यामुळे जगताप कुटुंबात उमेदवारी दिल्यास ही निवडणूक बिनविरोध व्हावी, असे आवाहन भाजपाच्या वतीने करण्यात आले होते. राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीतील इच्छुकांची संख्या आणि संभाव्य बंडखोरी याचा अंदाज अजित पवार यांनी घेणे अपेक्षीत होते. मात्र, महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली. त्यामुळे राष्ट्रवादीची 'रिस्क' वाढली असून, आगामी महापालिका निवडणुकीत याचे परिणाम पहायला मिळणार आहेत.

# मतांचे दान माझ्या पदरात टाका!

## » चिंचवड पोटनिवडणूक : अश्विनी लक्ष्मण जगताप यांचे आवाहन

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीतील भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी गुरूवारी (दि. १६) चिंचवड, वाल्हेकरवाडी भागातील नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन संवाद साधला. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे या शहराचे एकमेव विकासपुरूष होते. अश्विनी जगताप त्यांच्या पाठीशी खंबीरपणे होत्या. आता आम्ही अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहोत. त्या मतदारसंघाच्या सर्वांच्या जिवाभावाच्या आहेत. त्यामुळे पोटनिवडणुकीत त्यांनाच विजयी करण्याचा निर्धार वाल्हेकरवाडीतील जनतेने व्यक्त केला.**



भाजपा व मित्र पक्षाच्या उमेदवार अश्विनी जगताप यांनी गुरुवारी वाल्हेकरवाडीत घरोघरी जाऊन सर्व नागरिकांशी संवाद केला. यावेळी माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी नगरसेविका करुणा चिंचवडे, भाजपचे शहर उपाध्यक्ष शेखर चिंचवडे, सामाजिक कार्यकर्त्या पल्लवी वाल्हेकर, सामाजिक कार्यकर्ते सचिन शिवले यांच्यासह भाजप तसेच बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या मित्र पक्षांचे त्या भागातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लक्ष्मण जगताप यांचे योगदान अविस्मरणीय...

» वाल्हेकरवाडी भागातील नागरिकांनी अश्विनी लक्ष्मण जगताप यांचे जोरदार स्वागत केले. जागोजागी औक्षण करून त्यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या संवाद फेरीमुळे वाल्हेकरवाडी भाजपमय झाले होते. चिंचवड आणि वाल्हेकरवाडी भागातील नागरिकांनी कायमच भाजपला साथ दिली आहे. चिंचवड मतदारसंघाच्या विकासासाठी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी मोठे योगदान दिलेले आहे. त्यांचे विकासातील योगदान विसरण्यासारखे नाही. त्यांनी विकासाच्या माध्यमातून मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलला. ते शहरातील एकमेव विकासपुरूष होते. अश्विनी जगताप ठामपणे त्यांच्या पाठीशी उभ्या होत्या. आता त्यांच्या पाठीशी भक्कमपणे आम्ही उभे असल्याच्या भावना वाल्हेकरवाडीतील नागरिकांनी व्यक्त केल्या. पोटनिवडणुकीत अश्विनी लक्ष्मण जगताप यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचा निर्धारही वाल्हेकरवाडीतील नागरिकांनी व्यक्त केला.

# पुण्यात हे असलं खपवून घेणार नाही!

## अजित पवारांनी भाजपच्या मंत्र्याला फटकारलं

**। पुणे । महाईन्यूज ।**

विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आज पुण्यामध्ये माध्यमांशी संवाद साधला. पवारांनी विविध प्रश्नांची उत्तरं यावेळी दिली. यादरम्यान भाजपच्या मंत्र्यालाच अजित पवारांनी फटकारलं. पुण्यात हे असलं खपवून घेणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

आज केसरी वाड्यामध्ये भाजपच्या मेळाव्याचं आयोजन करण्यात आलेलं होतं. या मेळाव्याला आजारी असतांनाही गिरीश बापट यांची उपस्थिती होती. बापट ऑक्सिजन ट्यूब लावून व्हीलचेअरवर उपस्थित होते. त्याबद्दल बोलतांना अजित पवार म्हणाले की, काल भाजपचे नेते त्यांना भेटले, त्यांचे नाव म्हणजे देवेंद्र फडणवीस. फडणवीस यांनी बापट यांना सांगितले की, कसबामध्ये काळजीचे वातावरण आहे. त्यामुळे आजारी जरी असले तरी त्यांनी मेळावा केला.

चिंचवड मतदारसंघातल्या वंचित आघाडीच्या भूमिकेबद्दल पवार म्हणाले, वंचितची युती शिवसेनेशी झाली आहे, आघाडीशी नाही. वंचित आघाडीचे अध्यक्ष आणि टीमने ठराव केला आहे की आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा. आता ते ठराव पाठवतील आणि निर्णय घेतील.



मनसेच्या पाठिंब्याबाबत बोलतांना अजित पवार म्हणाले की, मनसे सारख्या एवढ्या मोठ्या पक्षाने पाठिंबा दिलं म्हणजे आमचे धाबं दणाणले, अशी मिश्कील टिप्पणी त्यांनी केली.

### गिरीश महाजन यांना इशारा

दरम्यान, गिरीश महाजन प्रचारामध्ये एका आरोपीसोबत दिसले होते. त्यावर बोलतांना अजित पवार म्हणाले की, हे अत्यंत चुकीचे आहे. पोलिसांनी आणि निवडणूक आयोगाने दखल घेतली पाहिजे. मंत्री असे वागत असतील, गुंड प्रवृत्तीला घेऊन दहशत निर्माण केली जात असेल तर इथल्या आयुक्तांनी नोंद घेतली पाहिजे. इतक्या खालच्या पातळीचे वागत असतील तर पुण्यात हे खपवून घेणार नाही, असा इशाराच त्यांनी दिला.

### रुपाली ठोंबरेंकडून गिरीश महाजनांवर टीका

पुण्यातील संदीप मोहोळ खून प्रकरणात ज्या तिघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे त्यापैकी संतोष लांडे हा सध्या जामीनावर बाहेर आहे. त्याच्यावर याआधी मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई देखील करण्यात आली आहे. या संतोष लांडेने तो गिरीश महाजनांसोबत प्रचार करत असतानाचे व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केल्याचं रुपाली पाटील ठोंबरे यांनी म्हटलं आहे. मतदारांना घाबरवण्याचा प्रयत्न भाजपकडून होत असल्याचा आरोप रुपाली पाटील यांनी केला आहे.

---

# कार्यकारी सोसायट्या आता शिक्षणसंस्था, रुग्णालये उभारणार

**पुणे :** गावपातळीवर आतापर्यंत केवळ शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते आणि पिकांसाठी कर्ज पुरवठा करणाऱ्या विविध कार्यकारी सोसायट्यांच्या नावात आता केंद्र सरकारने बदल केला आहे. त्यामुळे यापुढे या सोसायट्यांना आता बहुउद्देशीय कार्यकारी सोसायट्या अशी नवी ओळख मिळणार आहे. या नव्या ओळखीमुळे या सोसायट्या आता स्वतःच्या मालकीच्या शैक्षणिक संस्था, रुग्णालये उभारू शकणार आहेत. शिवाय यासह विविध ७५ प्रकारचे उद्योगधंदेही सुरु करू शकणार आहेत.यासाठी केंद्र सरकारने विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांच्या उपविधीत (बायलॉज) बदल केला आहे.



विविध कार्यकारी सोसायटी म्हटलं की गावपातळीवर शेतकऱ्यांसाठी कार्यरत गावातील छोटी संस्था. या सोसायट्यांना स्वतःचे असे कोणतेही उत्पन्नाचे स्त्रोत नाहीत. केवळ जिल्हा बँकेकडून कमी टक्क्याने कर्ज घ्यायचे ते शेतकऱ्यांना ते वितरित करायचे, एवढेच सध्या या सोसायट्यांचे काम. यानुसार आतापर्यंत या सोसायट्या खरीप व रब्बी हंगामातील पिकांसाठी जिल्हा बँकेच्या मदतीने कर्जपुरवठा करणे, शेतकऱ्यांना बी-बियाणांचा आणि रासायनिक खतांचा पुरवठा हा कर्जरूपाने करणे. फारफार तर शेतीपूरक व्यवसाय असलेले जसे कुक्कुटपालन, मत्स्यपालन, शेतकऱ्यांना शेतीची अवजारे भाड्याने देणे, शेतीच्या कामासाठी लागणारे ट्रॅक्टर भाड्याने देणे अशीच हलकीफुलकी आणि मर्यादित कामे करत असत. त्याला आता केंद्र सरकारने उद्योगधंद्यांची जोड दिली आहे.

---

# लोकांमध्ये पाण्याबाबत साक्षरता निर्माण व्हावी

## राज्याच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे आयुक्त चिंतामणी जोशी यांचे प्रतिपादन

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्याच्या ग्रामीण भागाचे आर्थिक आणि सामाजिक विकासाचे चक्र पाण्यावर अवलंबून आहे. सध्या भूजलाच्या अनियंत्रित उपशामुळे भूजल पातळी दिवसेंदिवस खालावत चालली आहे. ही खालावत चाललेली भूजल पातळी वाढविण्यासाठी ग्रामस्थांनी घरगुती आणि शेतीसाठीच्या पाणी वापराबाबत बचतीच्या उपाययोजनांचा करण्याची गरज आहे.

यासाठी जलसुरक्षा आराखडा, जल अंदाजपत्रक, भूजल पातळी, पर्जन्यमान, पाणी गुणवत्ता आदी बाबींबाबत ग्रामस्थांमध्ये साक्षरता निर्माण झाली पाहिजे, अशी अपेक्षा राज्याच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे आयुक्त चिंतामणी जोशी यांनी येथे बोलताना व्यक्त केली.

ग्रामस्थांनी अटल भूजल योजनेत समाविष्ट गावांनी लोकसहभागातून गावाची जलसमृद्धी टिकविण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी भूजल व्यवस्थापनासाठी लोकसहभागातून प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. भूजल विभागाच्यावतीने राज्यात अटल भूजल पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. या पंधरवड्याच्या उदघाटनप्रसंगी जोशी बोलत होते. यावेळी सहसंचालक डॉ. विजय पाखमोडे, प्रकल्प समन्वयक भाग्यश्री मग्गीरवार, वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. चंद्रकांत भोयर, प्रादेशिक उपसंचालक कार्यालयाचे डॉ. प्रमोद रेड्डी, जिल्हा भूवैज्ञानिक कार्यालयाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक एस. एस. गावडे आदी उपस्थित होते.



जोशी पुढे म्हणाले, 'भविष्यातील पाणी संकट टाळण्यासाठी आणि समृद्ध भविष्यासाठी गावाची जलसमृद्धी महत्त्वाची आहे. अटल भूजल योजनेत समाविष्ट असणाऱ्या गावांमध्ये योजनेच्या उद्दिष्टांबाबत व्यापक जनजागृतीवर भर दिला पाहिजे. लोकांनी घरगुती आणि शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचा उपयोग काटकसरीने व नियोजनबद्ध पद्धतीने करावा. ग्रामस्तरावर जनजागृती करण्यासाठी येत्या २७ फेब्रुवारीपर्यंत अटल भूजल पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या भूजल पातळीतील घसरण थांबवण्यासाठी केंद्र सरकार व जागतिक बँक यांच्या संयुक्त विद्यमाने भूजल व्यवस्थापनासाठी राज्यातील १३ जिल्ह्यातील १ हजार ४४२ गावांमध्ये भूजल अटल योजनेची अंमलबजावणी केली जात आहे.'

### पाण्याचा उपयोग काटकसरीने व नियोजनबद्ध

लोकांनी घरगुती आणि शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचा उपयोग काटकसरीने व नियोजनबद्ध पद्धतीने करावा. ग्रामस्तरावर जनजागृती करण्यासाठी येत्या २७ फेब्रुवारीपर्यंत अटल भूजल पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या भूजल पातळीतील घसरण थांबवण्यासाठी केंद्र सरकार व जागतिक बँक यांच्या संयुक्त विद्यमाने भूजल व्यवस्थापनासाठी राज्यातील १३ जिल्ह्यातील १ हजार ४४२ गावांमध्ये भूजल अटल योजनेची अंमलबजावणी केली जात आहे.'

# वंचित अडीच वर्षांत 'वंचित'च!

## » सामान्य कार्यकर्त्यांची भावना : पक्षश्रेष्ठींनी घेतलेल्या निर्णयाबाबत नाराजी?






। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. मात्र, यापूर्वी २०१९ मध्ये सर्वप्रथम वंचिने कलाटे यांना पुरस्कृत केले होते. त्यामुळेच त्यांना १ लाखाहून अधिक मते मिळाली होती. मात्र, गेल्या अडीच-तीन वर्षात मतदार संघातील वंचित घटकांच्या हक्कांसाठी कलाटे यांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून पुढाकार घेतला असता, तर कदाचित आगामी महापालिका निवडणुकीत वंचितचे तीन ते चार नगरसेवक निवडून आले असते, अशा भावना वंचित बहुजन आघाडीच्या सामान्य कार्यकर्त्यांकडून बोलून दाखवल्या जात आहेत.**

महाविकास आघाडीकडून तीव्र दावेदार असलेल्या राहुल कलाटे यांनी अखेर चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी अपक्ष अर्ज भरला. त्यामुळे महाविकास आघाडीच्या मतांची विभागणी होण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडीची युती झाली. मात्र, वंचित महाविकास आघाडीत अद्याप सहभागी झालेली नाही. दरम्यान, कसबा आणि चिंचवड मतदार संघात लागलेल्या पोटनिवडणुकीत वंचित कुणाला समर्थन करणार याकडे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांचे लक्ष लागले होते.

वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीची दुरदृष्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फन्सद्वारे) बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये कसबा आणि पिंपरी चिंचवड पोटनिवडणूकी संदर्भात चर्चा झाली. कसबा पोटनिवडणूक काँग्रेस लढत आहे. परंतु, काँग्रेस पक्षाच्या पक्षश्रेष्ठींकडून अजूनही वंचित बहुजन आघाडीकडे कसबा मतदारसंघात पाठिंबा द्यावा, असे विनंती पत्र आलेले नाही. आणि म्हणून कसबा पोटनिवडणूकी संदर्भात निर्णय घेण्यात आलेला नाही, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर यांनी घेतली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये पक्षाच्या भूमिकेबाबत काहीसा नाराजीचा सूर आहे. स्थानिक पातळीवर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी महाविकासा आघाडीसोबत जाण्याचा ठराव केल्याचे सांगितले जाते. पण, पक्षश्रेष्ठींनी घेतलेला निर्णय आम्हाला मान्य आहे आणि आम्ही त्यानुसार काम करणार आहोत, असा दावाही केला जातोय.

दुसरीकडे, राहुल कलाटे यांना २०१९ मध्येच वंचितने पाठिंबा दिला होता. त्यावेळी वंचितच्या कार्यकर्त्यांनी जीव ओतून काम केले. पण, आम्हाला काय मिळाले. राहुल कलाटे यांनी आतापर्यंत झालेल्या प्रत्येक सभा, बैठका आणि पत्रकार परिषदांमध्ये आपण अपक्ष होतो आणि मला मिळालेली मते अपक्ष म्हणून होती, असाच दावा केला. कधीही वंचितचा उल्लेख केला नाही. याहून पुढे गेल्या अडीच-तीन वर्षांच्या काळात कलाटे यांनी आम्हाला ताकद दिली असती, तर आगामी निवडणुकीत आमच्या विचारांचे तीन-चार नगरसेवक सहज निवडून आले असते, अशी खंतही व्यक्त केली जाते.

### राष्ट्रवादी भाजपासोबत जाण्याची वंचितला भिती?

» पहाटेच्या शपथविधी नंतर माध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेत अजित पवार यांनी स्पष्ट केले होते की हा त्यांच्या पक्षाचा निर्णय होता आणि वरिष्ठांनी तसे आधीच ठरवले होते. देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा पहाटेच्या शपथविधी संदर्भात खुलासा केलेला आहे आणि त्यामध्ये सरकार बनविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वोच्च नेते आणि अध्यक्ष यांचाही आशिर्वाद होता असे स्पष्ट केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने बीजेपी बरोबर जाणार नाही असा कुठेही खुलासा केलेला नाही, असा दावा रेखा ठाकूर यांनी केला आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भाजपासोबत जाईल, अशी भिती वाटते का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

" गौप्यस्फोटामुळे महाविकास आघाडी मध्ये परिस्थिती बदललेली आहे. वंचित बहुजन आघाडी पूर्ण विचार करून बीजेपीला पिंपरी-चिंचवड मतदारसंघात कोण थांबवू शकले, तर राहुल कलाटे थांबवू शकतात या मताला आली आहे. वंचित बहुजन आघाडी राज्य कार्यकारिणी एकमताने राहुल कलाटे यांच्या पाठीशी उभे राहील. याद्दष्टीने पाठींबा देऊन निवडून आणण्याचे आवाहन पिंपरी चिंचवड मधील मतदारांना वंचित बहुजन आघाडी करत आहे.

- रेखा ठाकूर, प्रदेशाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी

" पाठिंबा दिल्याबाबत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे मनापासून आभार मानतो. मागील निवडणुकीतही त्यांनी मला पाठिंबा दिला होता. वंचितने पाठिंबा दिल्याने माझे मनोबल उंचावले आहे. वंचितचा पाठिंबा, चिंचवडच्या जनतेचे आशिर्वाद या जोरावर मी नक्कीच विजयी होईल.

- राहुल कलाटे, अपक्ष उमेदवार

# शिवसेना ठाकरे गट आक्रमक!

## » चिंचवड पोटनिवडणूक :नाना काटे यांच्या प्रचारासाठी बैठका

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



**चिंचवड विधानसभेची निवडणूक ही आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. या निवडणुकीमध्ये कोणतीही पक्षविरोधी कृती सहन केली जाणार नसून पक्षाचा आदेश न मानल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या विजयासाठी कामाला लागा, असे आदेश शिवसेना संपर्कप्रमुख सचिन आहिर यांनी आज पार पडलेल्या शिवसेनेच्या बैठकीत दिले आहेत. आजच्या बैठकीमुळे नाना काटे यांच्या विजयाची जबाबदारी शिवसेनेने स्विकारल्याचे स्पष्ट झाले आहे.**

चिंचवड विधानसभेची पोटनिवडणूक सध्या चांगलीच गाजत आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या विजयासाठी आघाडीतील काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष शिवसेनेतील महत्त्वाचा घटक असून या पक्षाने नाना काटे यांना पाठिंबा दिला आहे. त्यापार्श्वभूमीवर चिंचवड विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी, निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत गुरुवारी संपर्कप्रमुख सचिन आहिर यांनी बैठक घेतली. या बैठकीला महिला संपर्क संघटिका लता पाष्टे, चिंचवड विधानसभा संपर्कप्रमुख दिलीप घोडेकर, शहराध्यक्ष सचिन भोसले, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, उपजिल्हा प्रमुख रोमी संधू, चिंचवड विधानसभा प्रमुख तथा माजी नगरसेवक अनंत कोऱ्हाळे, माजी शहराध्यक्ष योगेश बाबर, युवा सेनेचे अनिकेत घुले, उपशहर प्रमुख हरीष नखाते, श्रीमंत गिरी यांच्यासह पक्षाचे सर्व पदाधिकारी, विभागप्रमुख, शाखाप्रमुख व संघटकप्रमुख उपस्थित होते. प्रत्येक शाखेच्या माध्यमातून आपल्याला प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचायचे आहे. पोटनिवडणुकीच्या माध्यमातून आपल्याला गद्दारांना आणि त्यांना पाठींबा देणाऱ्यांना धडा शिकवायचा असल्याने नाना काटे यांचा विजय आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. पक्षाच्या भूमिकेविरोधात कोणीही काम केल्यास अथवा तसे आढळल्यास संबंधितांवर निलंबनासारखी कठोर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वांनी मनात कोणताही गैरसमज न बाळगता नाना काटे यांच्या विजयासाठी कटीबद्ध रहावे आणि काटे यांना जास्तीत जास्त मतांनी विजयी करणासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना वजा आदेशच सचिन आहिर यांनी दिले आहेत.

### बंडखोरावर कारवाई होणार !

» पक्षाची भूमिका ही महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराला पाठिंबा देण्याची असतानाही आपल्यातीलच एकाने बंडखोरी केली आहे. त्याचा आता पक्षाशी कोणताही संबंध राहिला नसून त्याच्यावर लवकरच निलंबनाची कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे बंडखोर उमेदवाराकडून होणाऱ्या कोणत्याही फसव्या प्रचाराला बळी पडू नका आणि नाना काटे यांच्या पाठिशी ठामपणे उभे रहा, असे आवाहनही आहिर यांनी यावेळी केले.

## संपादकीय »

# बंदीच बरी!

***जगातील सर्वात भव्य, सर्वात बलाढ्य, सर्वात लोकप्रिय, सर्वात प्राचीन लोकशाही देशातील सर्वात मोठ्या पक्षाने 'ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन' म्हणजे 'बीबीसी'चे वर्णन जगातील सर्वात भ्रष्ट वृत्तसेवा केले ते सर्वात योग्य असे आताशा आमचे मत आहे.***

यामागील कारण ही वृत्तसेवा केवळ साहेबाच्या देशातील आहे हे नाही. तसे पाहू गेल्यास जे जे साहेबाचे ते ते त्याज्यावे असेच आम्ही मानतो. उदाहरणार्थ लोकशाही. खरे पाहू गेल्यास ती भारतातून साहेबाच्या देशात आधी गेली आणि नंतर ती तेथून परत भारतात आली. जसे की योग. पूर्वीच्या आरोग्यदायी भारतात जेवून पोटास तड लागल्यावर घरच्या घरी केला जाणारा पवनमुक्तासनादी आसनयोग साहेबाच्या देशात गेला आणि भारतात योगा होऊन परत आला. लोकशाहीचेही असेच झाले. या विशाल, प्राचीन वगैरे देशातील जनकल्याणकारी संस्थानांत लोकशाही आधीपासूनच नांदत होती. ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली त्याच्या किती तरी आधी या देशातील गुर्जर बांधव फाफडा, ढोकळा इत्यादींच्या व्यापारासाठी साहेबाच्या देशात गेले आणि तमसा तीरी दुकान थाटून बसले होती याची कागदोपत्री नोंद आमच्याकडे आहे. (तिचा लवकरच इतिहासात समावेश करण्याचे आदेश देण्यात आले असून तसा आवश्यक तो बदल होईल.) तमसा तीरावरील या गुर्जर व्यापारी मंडळींच्या एकमेकांतील सौहार्दपूर्ण शंखस्वरांतील लोकशाहीयुक्त संभाषणामुळे साहेबास लोकशाही समजली. म्हणून लोकशाहीचे वर्णन 'नॉइझी सिस्टीम' असे केले जाते. भारतीय खाद्यपदार्थ सेवनामुळे साहेबाची पोटे बिघडू लागल्यामुळे आपले मसाले हुडकण्यासाठी साहेबाची पलटण भारतात आली आणि मसाले घेऊन मायदेशी परतली. भारतात असताना त्यांनी तमसा तीरावर खाद्यपदार्थ विकणाऱ्या भारतीयांतील लोकशाहीयुक्त संबंधांचे खूपच कौतुक केले. त्यामुळे साहेबानीच भारतात लोकशाही आणली असा काहींचा समज झाला. जे जे पाश्चात्त्य ते ते पवित्र असे मानण्याच्या पं. नेहरू आणि तत्समांच्या गाफीलपणामुळे साहेबास लोकशाही आणल्याचे श्रेय दिले जाते. ते चुकीचे आहे. म्हणून साहेबी लोकशाही प्रारूपाचा आपण त्याग करून खाविंदचरणारविंदी मिलिंदायमान अशा भारतीय लोकशाही पद्धतीचे आचरण करायला हवे.तसे केल्यास बीबीसीसारख्या भ्रष्ट यंत्रणांची काही गरजच राहणार नाही. तसेच व्हायला हवे. वृत्तमाध्यमांची मुळात गरजच काय? अंगभूत अशक्तपणामुळे क्षत्रिय कुलीन संरक्षण क्षेत्र न पेलणारे, अंकगणितात गती नसल्याने व्यापारउदिमात मागे पडणारे, कृश शरीरयष्टीमुळे ताकदीची कामे न झेपणारे इत्यादी बैठकबहादरांच्या उदरनिर्वाहाची सोय व्हावी म्हणून साहेबाने पत्रकारिता व्यवसाय जन्मास घातला.

# चॅट जीपीटी : माहितीशोधाचा जादूई दिवा




स्टीफन हॉकिंग म्हणत, 'परिवर्तन अंगीकारण्याची क्षमता म्हणजे बुद्धिमत्ता.' जीवसृष्टीत मानवी जीव उठून दिसतो तो त्याच्या बुद्धीचा वापर करण्याच्या क्षमतेमुळे! आता हेच शस्त्र आपल्या शरीरापासून वेगळं करून, आपल्यासाठी वापरण्याचं तंत्र मानव विकसित करू लागला आहे. त्याला कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशल इंटेलिजन्स – एआय) असं नाव देण्यात आलं आहे. डिजिटल साधनं आणि संगणकनियंत्रित यंत्रमानवही आपल्यासारखीच बुद्धी वापरू शकतील, अशी अशक्यप्राय वाटणारी व्यवस्था या एआयने निर्माण केली आहे. चॅट-जीपीटी हा अशा एआयचा ताजा आविष्कार आहे. आपली बुद्धी विचारेल, अशा हरेक प्रश्नाची चुटकीसरशी, मुद्देसूद आणि सुसंगत उत्तरे देऊ शकणारी कृत्रिम बुद्धी म्हणून नुकताच हा आविष्कार आपल्या सेवेत दाखल झाला आहे. डिजिटल तंत्रज्ञानातील प्रगतीचा हा नवा टप्पा चॅटबॉट प्रणालीच्या स्वरूपातील आहे. लिखित अथवा वाचिक मानवी संवादाचं हुबेहूब अनुकरण हे चॅटबॉटचं प्राथमिक कार्य. चॅट-जीपीटी (जनरेटिव्ह प्री-ट्रेन्ड ट्रान्सफॉर्मर-जीपीटी) हा सर्वात ताजा आणि नावीन्यपूर्ण बॉट आता या क्षेत्रात खळबळजनक क्रांती करू पाहत आहे. सॅन फ्रान्सिस्कोस्थित ओपन एआय या कंपनीने तो उपलब्ध करून दिला आहे. नोव्हेंबर २०२२मध्ये प्रसृत केलं गेलेलं हे तंत्रज्ञान अवघं सायबरविश्व व्यापण्याच्या दिशेनं झपाट्यानं पावलं टाकत आहे.

### चॅटबॉटची पार्श्वभूमी

जीपीटीमुळे बॉट हा शब्द अचानक सर्वसामान्यांच्या कुतूहलाचा ठरत असला, तरी ही प्रणाली काही अगदी नवी नाही. २०१६मध्ये मायक्रोसॉफ्ट कंपनीने या नावाचा बॉट तयार केला होता आणि अगदी अलीकडे, ऑगस्ट २०२२मध्ये मेटा कंपनीने ब्लेंडरबॉट नावाची प्रणाली प्रसृत केली होती. परंतु या प्रणाली सर्वमान्य ठरल्या नाहीत. चॅट-जीपीटी मात्र तशी मान्यता मिळवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

ओपन एआय कंपनीची स्थापना सॅम आल्टमन, इलॉन मस्क आदींनी २०१५मध्ये केली. चॅट-जीपीटी प्रसृत होऊन पाच दिवस




उलटले नाहीत, तोच या प्रणालीने दहा लाख सबस्क्राइबर्सचा टप्पा गाठला. प्रश्नकर्त्याचा हेतू जाणून त्यानुरूप उपयुक्त, सत्याधारित व निर्धोक उत्तर देणं हे चॅट-जीपीटीचं वैशिष्ट्य. अनेक ज्ञानशाखांतील प्रश्नांवर तपशीलवार आणि मुद्देसूद उत्तरे देण्याची क्षमता या प्रणालीत आहे.

चॅट-जीपीटी ३.५ ही याची सर्वात ताजी आवृत्ती. आंतरजालावरील सर्व माहिती आणि संकेतनांचा (कोडिंग) साठा पुरवून ही प्रणाली सेवासज्ज करण्यात आली आहे. चॅट-जीपीटी ३.० आवृत्तीविषयी स्टॅनफोर्ड विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार, १७५ अब्ज परिमिती आणि ५७० गिगाबाइट एवढी आशय स्वरूपातील माहिती यांच्या पुरवठ्यातून ही प्रणाली घडली. त्यामुळे कोणत्याही चौकशीचे समर्पक उत्तर देण्यास ती सिद्ध झाली.

### चॅट-जीपीटीचा वापर

चॅट-जीपीटी सध्या वापरकर्त्यांसाठी मुक्त उपलब्ध आहे. या नव्या संशोधनाचा आढावा घेण्याच्या हेतूने ते नि:शुल्क ठेवण्यात आले आहे. संगणकीय संकेतन लिहिणे आणि त्यातील दोष शोधून दूर करणे असो की गाण्याला चाल देणे असो, हरेक अपेक्षेची पूर्तता चॅट-जीपीटी करू शकते. ग्राहकसेवेसाठीही ही प्रणाली तत्पर आणि अचूक प्रतिसाद देऊ शकते. त्यामुळे कंपन्यांना आपली उत्पादनं व सेवा या ग्राहकांनुरूप घडवणे आणि सुधारणे सुकर होणार आहे. विक्रीपश्चात सेवा हे आता महत्त्वाचं क्षेत्र ठरत आहे. कमी साधनस्रोतांतून, परवडणारी आणि तरीही परिणामकारक ग्राहकसेवा पुरवणाऱ्या बॉटकडे कंपन्यांचा कल वाढत आहे. चॅट-जीपीटी हा त्यांच्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो. चॅट-जीपीटी प्रोफेशनल नावानं ही प्रणाली उपलब्ध होईल. त्यातून ओपन एआय कंपनीला २०२३मध्ये २० कोटी डॉलरचे उत्पन्न अपेक्षित आहे

### चॅट-जीपीटीचं भवितव्य

चॅट-जीपीटी म्हणजे भविष्यातलं गूगल असं म्हटल जातं. आजवरची या बॉटची प्रगती पाहता, ते अशक्य आहे, असं म्हणणं या टप्प्यावर तरी धाडसाचं ठरेल. ते क्षितिज अजून दृष्टिपथात नसलं, तरी सर्च इंजिन आणि बॉट दोन्ही एका प्रणालीत उपलब्ध होऊ शकते.

# मानवहिताची खरीखुरी वाट

**आज जग हवामान बदलांमुळे उग्र आपत्ती झेलत आहे. पण हा निसर्गाचा कोप नसून मानवाच्या निसर्ग व्यवस्थेत अविवेकी हस्तक्षेपाचा परिपाक आहे.**

विज्ञान-तंत्रज्ञानाचा कैफ चढवून निसर्गावर 'नियंत्रण' करण्याचा अट्टहास मानवाने - अधिक स्पष्ट शब्दात धन व तंत्र सत्ताधीशांनी - चालवला आहे. ४६० कोटी वर्षात उत्क्रांत झालेल्या पृथ्वीचे सरासरी तापमान प्रदीर्घ काळ स्थिर होते. मात्र, औद्योगिक क्रांतीनंतर खनिज इंधनाचा बेछूट वापर आणि उपभोगाच्या अचाट विस्तारमुळे तापमानवाढ होऊन ते तुलनेत १.१ अंश सेल्सियसने वाढले आहे. ते १.५ अंशावर रोखले नाही तर भीषण आपत्ती अपरिहार्य आहेत. तापमानवाढीचे मुख्य कारण कार्बन उत्सर्जन असून वातावरणातील त्याचे प्रमाण जे कोटी घटकांमध्ये २८ एवढे होते. ते गत दोन दशकात दीडपट झाले. हे मुख्य पेलण्यासाठी कोळसा, तेल व वायू या जीवाश्म अगर खनिज इंधनाचा वापर थांबवणे आवश्यक आहे. आज जगात हायड्रोजन, कार्बन ऊर्जा, वाहतूक, उत्पादन, उपभोग स्रोत व साधने प्रचंड प्रमाणात वापरली जातात त्याला मर्यादा हवी. म्हणजेच शून्य कर्बउत्सर्जन (नेट झिरो) प्रकल्पांना नियोजन व धोरणात



प्राधान्य हवे. प्रचलित विकास प्रकल्प प्रक्रिया व संरचनेत आमूलाग्र बदल, पर्यायी स्रोत व साधने वेगाने विकसित करणे हीच विकासाची मूलभूत दिशा असावी. हवामान बदल, जलवायू परिवर्तन म्हणजेच 'क्लायमेट चेंज' समस्येविषयी आज वैज्ञानिक धोरणकर्ते सांगत असलेल्या प्रश्नांचे सम्यक आकलन ही वसुंधरेच्या रक्षणाची प्राथमिक गरज आहे.

चैनचंगळवादी विकासप्रणाली व जीवनशैली जगभरचे धनदांडगे रेटत आहेत, ती मानव व वसुंधरेला घातक आहे. मानवाच्या मूलभूत गरजा भागवणे व जीवन आरोग्यदायी बनवण्यासाठी निसर्गाचे अनाठायी शोषण अपरिहार्य नाही. किंबहुना आज गरजांच्या पूर्ततेऐवजी चंगळवादी वस्तूंसाठी नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर होतो. सध्या जगात ५० टक्के व भारतातील ७० टक्के जनता प्राथमिक वस्तू व मूलभूत सेवांपासून वंचित आहे. भारतात १०० कोटी अभावग्रस्तांना वंचित ठेवून नैसर्गिक संसाधनाचा वापर मर्यादित करावा, असे खचितच नाही. अर्थात, समतामूलक शाश्वत विकास प्रणाली संसाधनांचा एकूण वापर न वाढवता, त्यांची वापर-पद्धती मूलतः बदलावी लागेल. याचा अर्थ नैसर्गिक संसाधनाचा वापर सर्वांच्या समानहित व गरजांसाठी केला जाईल. तात्पर्य, उत्पादन व्यवस्थेची संरचना व अग्रक्रम बदलून एकंदरीत वापर व विनियोग निसर्गाच्या पुनःनिर्मिती व धारणक्षमतेच्या मर्यादित ठेवणे नितांत गरजेचे आहे.जमीन, पाणी, वनेकुरणे (जल-जंगल-जमीन) ही सर्व संसाधने सामूहिक मालकीची हवीत. आजही ६० टक्के जमीन जे स्वतः प्रत्यक्ष कसत नाहीत, त्यांच्या मालकी व नियंत्रणात आहे. त्यामुळे शेतमजुरांची संख्या शेतकऱ्यांपेक्षा अधिक आहे.

## ॥ अभंगवाणी ॥



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदे-फडणवीस सरकारचा बॉलिवूडवर अंकुश!

## » मनोरंजनसृष्टीसाठी नवी नियमावली लागू

।अलिबाग। महाईन्यूज ।

**शाहरुख खानच्या 'पठाण' या चित्रपटाने बॉलिवूडला चांगले दिवस आले असले तरी सोशल मीडियावर अजूनही बॉलिवूडविरोधात वक्तव्य केली जात आहेत. एकूणच गेल्या एक दोण वर्षापासूनच बॉलिवूडवर प्रेक्षक चांगलेच नाराज झाले आहेत. मग ते चित्रपटाची कथा कारण असो, नेपोटीजम असो किंवा कंपूशाही असो किंवा इंडस्ट्रीमधील राजकारण असो. शिवाय गेल्यावर्षी सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या 'बॉयकॉट बॉलिवूड' ट्रेंडचा फटकासुद्धा मोठमोठ्या सेलिब्रिटीजना बसला.**



आता बॉलिवूडमध्ये काम करणारे कलाकार, कामगार, निर्माते यासगळ्यांना एक नवी नियमावली लागू करण्यात येणार असल्याचं वृत्त समोर आलं आहे. महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस सरकार हे आता बॉलिवूडमधील कलाकारांवर आणि त्यांच्या मनमानीवर अंकुश ठेवण्यासाठी एक नवी नियमावली जाहीर करणार आहेत .बॉलिवूडमध्ये समान वेतनाची गंभीर समस्या असल्याने हा निर्णय घेण्यात आला असल्याचं स्पष्ट झालं आहे. राज्यसरकारच्या नियमानुसार आता प्रत्येकाला समान वेतन देणं हे निर्मात्यांना भाग पडणार आहे, इतकंच नाही तर मनोरंजनसृष्टीतील कामगारांना काम बंद करून निर्माते आणि दिग्दर्शकांना जाबही विचारता येणार आहे. याबरोबरच मनोरंजनसृष्टीत काम करणाऱ्या व्यक्तीची तक्रार नोंदवण्यासाठी एक स्वतंत्र नवं पोर्टलही तयार करण्यात येणार आहे.

केवळ चित्रपटच नव्हे तर मालिका, जाहिराती, ओटीटी क्षेत्रातसुद्धा हे नियम लागू होणार आहेत. शिवाय महिला कलाकार आणि कामगारांना घरपोच वाहतूक सुविधा पुरवायचेसुद्धा आदेश राज्यसरकारने दिले आहेत. गेल्या काही दिवसांपासून या क्षेत्रातील लोकांच्या समस्या समोर येत होत्या. त्यावरच विचार विनिमय करून शिंदे-फडणवीस सरकारने सांस्कृतिक विभागाची मदत घेत ही नवी नियमावली तयार केली आहे. लवकरच यासंबंधीत अधिकृत माहिती सरकारच्या वतीने देण्यात येईल.

### तक्रार नोंदवण्यासाठी एक स्वतंत्र नवं पोर्टल

» बॉलिवूडमध्ये समान वेतनाची गंभीर समस्या असल्याने हा निर्णय घेण्यात आला असल्याचं स्पष्ट झालं आहे. राज्यसरकारच्या नियमानुसार आता प्रत्येकाला समान वेतन देणं हे निर्मात्यांना भाग पडणार आहे, इतकंच नाही तर मनोरंजनसृष्टीतील कामगारांना काम बंद करून निर्माते आणि दिग्दर्शकांना जाबही विचारता येणार आहे. याबरोबरच मनोरंजनसृष्टीत काम करणाऱ्या व्यक्तीची तक्रार नोंदवण्यासाठी एक स्वतंत्र नवं पोर्टलही तयार करण्यात येणार आहे.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन!

## » मागण्या पूर्ण न झाल्यास बेमुदत संप पुकारणार

।मुंबई। महाईन्यूज ।

**महाराष्ट्र राज्य विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन सुरू आहे. जुनी पेन्शन, आश्वासित प्रगती योजना, शिक्षकेतर कर्मचारी भरती, सातव्या वेतन आयोगाची थकबाकी आदी. मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येत आहे. या मागण्या पूर्ण न झाल्यास बेमुदत संप पुकारणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.**



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर सुद्धा लेखी आश्वासन मागण्यांसंदर्भात दिले जावे अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे आज विद्यापीठात, महाविद्यालयात कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले. मुंबईत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारल्याने मुंबईतील आज अनेक महाविद्यालय बंद, विद्यार्थ्यांच्या परीक्षांना या आंदोलनामुळे फटका बसला आहे.

राज्यातील अकृषी विद्यापीठ त्यासोबतच महाविद्यालयांमध्ये शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने आज एक दिवसाच्या संपावर गेले. बुधवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. मात्र, जोपर्यंत मागण्या लेखी मान्य होत नाहीत तोपर्यंत हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा पवित्रा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने घेतला आहे .बारावीच्या सध्या प्रात्यक्षिक परीक्षा सुरू आहेत. मात्र, लेखी परीक्षा 21 फेब्रुवारीपासून सुरू होणार असल्याने याचा फटका पदवी त्यासोबतच बोर्डाच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना बसू शकतो.

# सत्यजित तांबेंनी घेतली विखे पाटलांची भेट

## » राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

। नाशिक ।महाईन्यूज।

नाशिक पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवारीवरुन काँग्रेसमध्ये अंतर्गत कलह निर्माण झाल्याचे पाहिला मिळाले होते. काँग्रेसने सत्यजीत तांबे यांचे वडील सुधीर तांबे यांना पदवीधर मतदारसंघासाठी एबी फॉर्म दिला होता.मात्र ऐनवेळी सुधीर तांबे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. त्याऐवजी सत्यजीत तांबे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली आणि ते निवडून आले.नवनिर्वाचित आमदार सत्यजित तांबे यांनी विखे पाटलांची भेट घेतल्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. सत्यजित तांबेंनी राधाकृष्ण विखे पाटील यांचे बंधू राजेंद्र विखे यांची भेट घेतली आहे.

त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. एकीकडे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना भाजपकडून पक्ष प्रवेशाची ऑफर दिली जात आहे. तर दुसरीकडे विखे आणि थोरात यांच्यात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत.



थोरात आणि विखे यांच्यातील वाद राज्याला माहित आहे मात्र बाळासाहेबांचे भाचे असलेल्या सत्यजित तांबे यांना नाशिक पदवीधर निवडणुकीत राधाकृष्ण विखे पाटील आणि खासदार सुजय विखे यांनी उघडपणे पाठिंबा दिला होता.

त्यानंतर भाजपमध्ये यावे अशी थेट ऑफर देखील राधाकृष्ण विखे पाटील यांनी सत्यजित तांबे यांनी दिली होती. दरम्यान आता राजेंद्र विखे यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधान आलं आहे.

# निवडणूक यंत्रणा हॅक करण्यासाठी इस्त्रायली हॅकर्सचा वापर?

## काँग्रेसचा मोदी सरकारला सवाल

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या इस्त्रायलमधील एका कंपनीने जगभरातील ३० निवडणुकांमध्ये हस्तक्षेप केल्याचा धक्कादायक अहवाल उघडकीस आला आहे. विविध माध्यमसमूहातील ३० पत्रकारांनी मागील आठ महिने संबंधित इस्त्रायली कंपनीवर आणि त्यांच्या कार्यपद्धतीवर संशोधन केलं. त्यानंतर या कंपनीने जगातील ३० निवडणुकांमध्ये फेरफार केल्याचा धक्कादायक अहवाल सादर केला. हा अहवाल समोर आल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर खळबळ उडाली आहे.**



याच पार्श्वभूमीवर काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर निशाणा साधला. भारतातील निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी भाजपानेही परदेशी हॅकर्सचा वापर केला का? असा सवाल काँग्रेसने गुरुवारी विचारला. संबंधित इस्त्रायली हॅकर्स कंपनीचं नाव 'जॉर्ज' (JORGE) आहे. कंपनीच्या सॉफ्टवेअरचे नाव 'AIMS' अर्थात ADVANCE IMPACT MEDIA SOLUTION असं आहे. या कंपनीने सोशल मीडियावर हॅकिंग करून आणि चुकीची माहिती पसरवून जगभरातील ३० पेक्षा अधिक निवडणुकांमध्ये हस्तक्षेप केल्याचा दावा आहे.हा अहवाल प्रसारित झाल्यानंतर काँग्रेस मीडिया युनिटचे प्रमुख पवन खेरा यांनी पत्रकार परिषद घेत भाजपावर निशाणा साधला.

“भाजपा आणि मोदी सरकारने भारतातील निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी परदेशी हॅकर्सचे नेटवर्क वापरले का?” असा सवाल त्यांनी विचारला. त्यांनी 'जॉर्ज' इस्त्रायली कंपनीची तुलना भाजपाच्या आयटी सेलशी केली. तसेच केंब्रिज ॲनालिटिका आणि पेगासस व्हायरसचा उल्लेख करत भाजपावर टीकास्त्र सोडलं.

### भाजपावर निशाणा साधला.

**» सोशल मीडियावर हॅकिंग करून आणि चुकीची माहिती पसरवून जगभरातील ३० पेक्षा अधिक निवडणुकांमध्ये हस्तक्षेप केल्याचा दावा आहे.हा अहवाल प्रसारित झाल्यानंतर काँग्रेस मीडिया युनिटचे प्रमुख पवन खेरा यांनी पत्रकार परिषद घेत भाजपावर निशाणा साधला. “भाजपा आणि मोदी सरकारने भारतातील निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी परदेशी हॅकर्सचे नेटवर्क वापरले का?” असा सवाल त्यांनी विचारला. त्यांनी 'जॉर्ज' इस्त्रायली कंपनीची तुलना भाजपाच्या आयटी सेलशी केली. तसेच केंब्रिज ॲनालिटिका आणि पेगासस व्हायरसचा उल्लेख करत भाजपावर टीकास्त्र सोडलं.**

खरं तर, ब्रिटनमधील 'द गार्डियन' आणि फ्रान्समधील 'द ले मॉंडे'सह अन्य ३० माध्यमसमूहाच्या शोध पत्रकारांनी इस्त्रायली कंपनीचा पर्दाफाश केला. त्यांनी संबंधित कंपनीला अहवालामध्ये “टीम जॉर्ज” असं संबोधले. कंपनीची काम करण्याची पद्धत आणि त्यांच्या क्षमतांबद्दल माहिती गोळा करण्यासाठी या पत्रकारांच्या टीमने बनावट ग्राहक पाठवले. या अहवालानुसार, ही कंपनी ताल हानान (वय-५०) नावाच्या व्यक्तीकडून चालवली जाते. हानान हा इस्रायली स्पेशल फोर्समध्ये ऑपरेटिव्ह म्हणून काम करत होता. तो सध्या “जॉर्ज” हे टोपणनाव वापरून काम करतो. मागील दोन दशकांहून अधिक काळ विविध देशांतील निवडणुकांमध्ये हस्तक्षेप केल्याचा त्याच्यावर संशय आहे. त्यामुळे तो तपास यंत्रणांच्या रडारवर होता, असंही या अहवालात म्हटलं आहे.

# आर्थिक संकटाशी लढणाऱ्या श्रीलंकेत वीजपुरवठा होणार पूर्ववत

## 66 टक्के दरवाढीची घोषणा

।कोलंबो। महाईन्यूज ।

पाकिस्तान आर्थिक गर्तेत सापडलेला असल्याने तिथे महागाईचा आगडोंब उसळला आहे. मोठ्याप्रमाणावर वीजटंचाई असल्याने विजेच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. तर दुसरीकडे, पाकिस्तानप्रमाणेच आर्थिक संटकाचा सामना करणाऱ्या श्रीलंकेची स्थितीमध्ये काहीसा सुधार झाल्याचे समोर आले आहे. सुमारे एक वर्षाच्या लोडशेडिंगनंतर आज, गुरुवारपासून श्रीलंकेत लोकांना अखंड वीज मिळणार आहे. मात्र, यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने घातलेल्या अटीनुसार वाढीव शुल्क भरावे लागणार आहे.

राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांच्या माध्यम विभागाकडून वीज पुरवठ्याबाबतच्या एक निवेदन जारी करण्यात आले आहे. दर सुधारणेच्या अंमलबजावणीनंतर ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले असल्याचे या निवेदनात म्हटले आहे. आयएमएफकडून 2.9 अब्ज अमेरिकन डॉलर्स मिळण्याचे उद्दिष्ट असल्याने श्रीलंका सरकारने हे पाऊल उचलले आहे. गेल्या वर्षी जानेवारीपासून 1 ते 14 तास वीज भारनियमन करण्याचा आदेश गुरुवारी रद्द करण्यात आला असल्याचे विद्युत कंपनीने म्हटले आहे. अखंडित विजेसाठी 66 टक्के दरवाढ लागू असेल.गेल्या सहा महिन्यांतील ही दुसरी दरनिश्चिती आहे. याआधी ऑगस्ट 2022मध्ये 70 टक्के दरवाढ करण्यात आली होती.आम्हाला माहीत आहे की लोकांसाठी, विशेषत: गरीबांसाठी ही दरवाढ आवाक्याबाहेरची आहे. परंतु श्रीलंका आर्थिक संकटात अडकला आहे आणि आमच्याकडे असा निर्णय घेण्याशिवाय पर्याय नाही. सरकारने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) दिलेल्या पर्यायाची निवड केली आहे. सरकारने उचललेले हे पाऊल आयएमएफकडून पुरविल्या जाणाऱ्या कर्ज सुविधेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल, असे ऊर्जामंत्री कांचना विजेसेकेरा म्हणाले. विजेवर सबसिडी देण्यासाठी तिजोरीत पैसे नाहीत.



### ट्रेड युनियन आणि विरोधकांचा आक्षेप

**»तथापि, सरकारच्या वीजदरवाढीच्या निर्णयाला कामगार संघटना आणि विरोधी पक्षांनी विरोध केला आहे. दरवाढ कमी करण्यासाठी संयुक्तपणे आंदोलन करण्याच्या तयारी ते आहेत. आर्थिक संकटाला योग्य प्रकारे हाताळण्यात सरकारला अपयश आल्यानेच गेल्यावर्षी एप्रिलच्या सुरुवातीपासून श्रीलंकेत सरकारविरोधात निदर्शने होत आहेत.**

# कोल्हापुरातील महालक्ष्मी महाउत्सव वादात

## महापालिकेचे संयोजकांना खुलासा करण्याचे आदेश

।कोल्हापुर। महाईन्यूज ।

विविध आजारांवर दिव्य मंत्रांनी दैविक प्रार्थना असा उल्लेख असलेला कोल्हापुरातील महालक्ष्मी महाउत्सव वादात सापडला आहे. याबाबत सामाजिक संस्थांनी तक्रारी केल्यानंतर महापालिकेने अवास्तव दाव्याबाबत खुलासा करण्याचे आदेश संयोजकांना दिले आहेत.

कोल्हापूर शहरात मध्यवर्ती ठिकाणी महालक्ष्मी महाउत्सव या आशयाचे मोठे फलक तसेच रिक्षांवर पोस्टर्स लावण्यात आले आहेत. २६ फेब्रुवारी ते ५ मार्च दरम्यान श्री कृष्णगिरी पार्श्व पद्मावती सेवा ट्रस्ट महाराष्ट्र शाखा यांच्यावतीने होणाऱ्या कार्यक्रमतील ' विविध आजारांवर दिव्य मंत्रांनी दैविक प्रार्थना' या उल्लेखास कॉमन मॅन संघटनेचे अध्यक्ष वकील बाबा इंदुलकर, प्रजासत्ताक सेवा संघटनेचे अध्यक्ष दिलीप देसाई तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आक्षेप घेतला आहे.

फलकावर श्री कोल्हापूर महालक्ष्मी असा उल्लेख केल्याने भाविक पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडे विचारणा करीत आहेत. ' या कार्यक्रमाचा देवस्थान समिती, महालक्ष्मी मंदिर बाबत कसलाही संबंध नाही.

नावात साम्य ठेवून इतर संस्था हे कार्यक्रमकरीत आहेत ', असे देवस्थान समितीचे सचिव शिवराज नाईकवाडे यांनी सांगितले. देवस्थान समितीच्या विधीज्ञांशी चर्चा करून संबंधितांवर कायदेशीर कारवाईचा विचार असल्याचेही त्यांनी नमूद केले.




### तर कायदेशीर गुन्हा

**» कार्यक्रमाबाबत महापालिका व पोलीस यांची परवानगी प्रत निदर्शनास येत नाही. जाहिरातीचे अवलोकन केले असता त्यामधून आपल्या मार्फत आरोग्यविषयक चुकीचे अशास्त्रीय पद्धतीने वैद्यकीय उपचाराविषयी जाहिरातबाजी करणे कायदेशीर गुन्हा होऊ शकतो, असे महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे संयोजक सुजित मंडलेचा यांना पाठवलेल्या नोटीस मध्ये म्हटले आहे.**

# करण कुंद्राला तेजस्वीसोबत लवकरच करायचंय लग्न

टीव्हीवरील सर्वात गोड आणि रोमँटिक कपल करण कुंद्रा आणि तेजस्वी प्रकाश लवकरच लग्न करणार आहेत. आता खुद्द करण कुंद्राने एका मुलाखतीत त्याच्या आणि तेजस्वीच्या लग्नाबाबत अनेक खुलासे केले आहेत. ही बातमी ऐकून कपलच्या चाहत्यांनाही आनंद होईल. त्याच्या नवीन टीव्ही शो 'इश्क मी घायाल'च्या प्रमोशन दरम्यान, करण कुंद्रा वेडिंग प्लॅन बद्दल बोलला आहे.

तेजस्वी प्रकाश आणि करण कुंद्रा अनेकदा रोमँटिक डेटवर जाताना दिसले. सोशल मीडियावरही कपल्स त्यांच्या रोमँटिक फोटोंमुळे चर्चेत असतात. अलीकडेच व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने करणने तेजस्वीला अतिशय खास पद्धतीने शुभेच्छा दिल्या. दरम्यान, या दोघांच्या लग्नाच्या बातमीने आणखी खळबळ उडाली आहे. करण कुंद्राने नुकतेच रेडिओ सिटीशी संवाद साधताना त्याच्या आणि तेजस्वीच्या लग्नाबद्दल खुलेपणाने सांगितले. अभिनेता म्हणाला, 'मी पुढच्या महिन्यात मार्चमध्ये लग्न करण्यास तयार आहे. बिग बॉस नंतर, माझे आणि तेजस्वीचे कुटुंबातील सदस्यही तयार होते, परंतु आमच्या कामाच्या बांधिलकीमुळे विलंब होत आहे'.

तिचा नागिन 6 टीव्ही शो संपत नाहीये, मग करण गमतीने तेजस्वीला विचारतो की एवढा यशस्वी सीझन देण्याची काय गरज होती आणि नंतर विचारतो - तुझ्याकडे लग्नासाठी वेळ कधी आहे?.करण कुंद्रा म्हणाला की, फिल्मसिटीमध्ये, सेटवर मी कुठेही लग्न करायला तयार आहे. एवढ्या वर्षात सतत लग्नाच्या प्रश्नाचा कंटाळा आला नाही का, असा प्रश्न त्याला विचारण्यात आला, तेव्हा तो म्हणाला की, या प्रश्नाचा मला कधीच कंटाळा येत नाही.

इतकेच नाही तर करण कुंद्राने तेजस्वीसोबतच्या लग्नाच्या घाईबाबतही आपले मत मांडले. तो म्हणाला की लग्नाच्या प्रश्नावर मला थोडी काळजी वाटते, पण लोकांना आम्हाला एकत्र बघायचे आहे हेही खरे आहे. लोकांना आमचे प्रेम आणखी एक पाऊल पुढे बघायचे आहे. ही एक सुंदर भावना आहे."





# शाहिद कपूरच्या 'फर्जी'चा जगभरात डंका

बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूर आणि विजय सेतुपती यांनी राज निदिमोरू आणि कृष्णा डीके यांच्या निर्मिती 'फर्जी'मधून डिजिटल पदार्पण केले आहे. ही सिरीज 10 फेब्रुवारी रोजी OTT प्लॅटफॉर्म प्राइम व्हिडिओवर रिलीज झाली. बॉलिवूडच्या कबीर सिंगच्या ओटीटी पदार्पणाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. त्याचबरोबर ही सिरीज केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर हिट झाली आहे. अनेक देशांमध्ये 'फर्जी' टॉप 10 च्या यादीत आला आहे. याची माहिती खुद्द शाहिदने त्याच्या इन्स्टाग्रामवर दिली आहे.

# सुकेशने दिल्या जॅकलीन 'व्हॅलेंटाइन डे'च्या शुभेच्छा

खंडणीखोर सुकेश चंद्रशेखर 200 कोटींच्या खंडणी वसूल केल्याच्या आरोपाप्रकरणी मागील काही महिन्यांपासून दिल्लीच्या मंडोली तुरुंगात आहे. सुकेशचे बॉलिवूडमधील बऱ्याच अभिनेत्रींसोबत प्रेमसंबंध असल्याचं सत्य काही दिवसांपूर्वी समोर आलं होतं. अनेक बॉलिवूड अभिनेत्रींना महागड्या भेट वस्तू देऊन भूरळ पाडली होती. दरम्यान, अशातच सुकेशचं नाव पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. मंगळवारी सुकेशने जॅकलिन फर्नांडिसला 'व्हॅलेंटाइन डे'च्या शुभेच्छा दिल्या आहेत.

सुकेशला दिल्लीतील कोर्टामध्ये दाखल करण्यात आलं होतं त्यावेळी तिथल्या पत्रकारांनी त्याला जॅकलीनबाबत काही प्रश्न विचारले. यावर सुकेश पत्रकारांना म्हणाला की, "जॅकलीनला माझ्याकडून 'व्हॅलेंटाइन डे'च्या शुभेच्छा द्या". असं सुकेश म्हणाला.

पुढे पत्रकारांनी जॅकलीनने त्याच्यावर केलेल्या आरोपांबाबत काही प्रश्न विचारले त्यावेळी तो म्हणाला की, "मला यावर काहीच बोलायचे नाही. यामागे नक्कीच तिचे काही कारण असेल. ज्यावेळी तुम्ही एखाद्यावर प्रेम करता तेव्हा तुम्ही त्या व्यक्तीचे संरक्षण करता."

## बॉलिवूड अभिनेत्रींना भेट दिली गिफ्ट

सुकेशने बॉलिवूडमधील अनेक अभिनेत्रींना महागड्या भेट वस्तू देऊन भूरळ पाडली होती. यात जॅकलीन फर्नांडिस, नोरा फतेही, श्रद्धा कपूर, सारा अली खान, जान्हवी कपूर यांसारख्या अनेकींच्या नावाचा सहभाग आहे. सुकेशने जॅकलीन फर्नांडिसला 52 लाखाचा घोडा आणि 9 लाखांची पर्शियन मांजर देखील भेट दिली होती.



# 'मास्टरशेफ इंडिया' मधील 'ठेचा क्वीन' सुवर्णा बागुल

हिंदी टेलिव्हिजनवरील बहुचर्चित "मास्टरशेफ इंडिया " हा कार्यक्रम सध्या चांगलाच चर्चेत आहे. "मास्टरशेफ इंडिया " या शोमध्ये सध्या टॉप 15 होम कुक्सची निवड करण्यात आली असून या सत्राच्या विजेतेपदासाठी त्यांच्यात स्पर्धा रंगणार आहे. मुंबईच्या सुवर्णा विजय बागुल या टॉप 15 स्पर्धकांपैकी एक आहेत. सुवर्णा या शोमध्ये महाराष्ट्रातील विविध पाककलेचे प्रतिनिधित्व करत आहेत.

## 'ठेचा क्वीन'चा होम शेफ ते मास्टर शेफ प्रवास

सुवर्णा कार्यक्रमात विविध महाराष्ट्रीयन खाधपदार्थ दाखवण्यासाठी आणि मास्टरशेफ इंडियामध्ये येण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी



आल्या आहेत. या शोचे परीक्षक रणवीर ब्रार, गरिमा अरोरा आणि विकास खन्ना आहेत. ते सुवर्णाला या शोमधली "ठेचा क्वीन" असे म्हणतात. सुरुवातीला या शोसाठी देशभरातून टॉप 36 होमकुक्स आले होते, ज्यामध्ये सुवर्णाच्या "महाथाळी" ची निवड झाली. या थाळीत सर्व महाराष्ट्रीयन फ्लेवर्स होते.

एका मुलाखतीत सुवर्णा यांनी सांगितले होते की, त्यांना आयुष्यात काहीतरी केले पाहिजे असं नेहमी वाटायचं. त्याप्रमाणे त्यांना "मास्टरशेफ" साठी संधी चालून आली. ज्या संधीची त्या वाट बघत होत्या ती संधी स्वत: होऊन त्यांच्याकडे चालत आली. तेव्हापासून थोडं- थोडं करत त्यांनी घरी सराव करण्यास सुरुवात केली. तसेच विविध प्रकारचे खादय पदार्थ बनविण्याचे कार्यक्रम बघायला सुरुवात केली. मात्र, यासगळ्यात सिंजन 2 ते सिंजन 6 निघुन गेले त्यादरम्याण एक प्रयत्न देखील करण्यात आला. मात्र त्यात यश मिळाले नाही. तरीही संयम ठेवून पुढे-पुढे जात राहिल्या आणि शेवटी 'मास्टरशेफ इंडिया 7' सिजनटची ऑडिशन घोषित झाली. त्यांनी ऑडिशनची पुर्ण तयारी केली. त्यांना त्यांचे लक्ष मिळाले आणि सिलेक्शन देखील झाले.

# दिल्लीचे मैदान मारण्यासाठी टीम इंडिया सज्ज!

## कांगारूंशी दोन हात करण्यासाठी रोहितची काय असेल रणनीती?

। मुंबई।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या दरम्यानच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना शुक्रवारी (१७ फेब्रुवारी) दिल्ली येथे खेळला जाईल. अरुण जेटली स्टेडियम येथे होणाऱ्या या सामन्यातून मालिकेत पुनरागमन करण्याचा ऑस्ट्रेलिया संघाचा प्रयत्न असेल. नागपूर येथील पहिल्या कसोटीत पराभूत व्हावे लागल्यानंतर, ऑस्ट्रेलिया संघ या कसोटीसाठी आपल्या संघात बदल करताना दिसणार आहे. ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्स याने याबाबतचे सूचक वक्तव्य केले आहे.



चार सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना नागपूर येथे खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाने एकतर्फी वर्चस्व गाजवले होते. यजमान संघाने अवघ्या तीन दिवसात ऑस्ट्रेलियाला एक डाव आणि १३२ धावांनी जिंकला. ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी भारतीय फिरकीपटूं पुढे नांग्या टाकल्याने त्यांना हा पराभव पत्करावा लागला. दिल्ली कसोटीआधी बोलताना ऑस्ट्रेलियन कर्णधार कमिन्सने संघात बदल होण्याची हिंट दिली. त्याने मधल्या फळीतील फलंदाज ट्रेविस हेडबद्दल बोलताना म्हटले,“हेड सध्या शानदार फॉर्ममध्ये आहे. त्याची मागील वर्षातील कामगिरी उत्कृष्ट होती. त्याचा संघात समावेश करण्याबाबत आमची चर्चा सुरू आहे ”हेड सध्या जागतिक कसोटी फलंदाजी क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर आहे. नागपूर कसोटीत त्याला वगळून मॅट रेनशॉ याला संधी दिल्याने अनेक माजी क्रिकेटपटूंनी नाराजी व्यक्त केली होती.

तसेच कमिन्स याने अनुभवी फलंदाज डेव्हिड वॉर्नर याच्या विषयी देखील आपले मत व्यक्त केले. तो म्हणाला, “वॉर्नरची भारतातील फॅन फॉलाईंग मोठी आहे. ज्यावेळी तो त्याच्या फॉर्ममध्ये येतो तेव्हा तो गोलंदाजांवर वर्चस्व गाजवतो. आम्ही या खेळपट्टीबद्दल फारसे काही बोलू इच्छित नाही. मात्र, येथे देखील चेंडू वळण घेताना नक्कीच दिसेल.”

भारतीय संघाबाबत बोलायचे झाल्यास दुखापतीमुळे श्रेयस अय्यरला नागपूर कसोटीत खेळता आले नव्हते आणि तो राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत उपचारासाठी दाखल झाला होता. आता तो पूर्णपणे फिट होऊन दिल्ली येथे होणाऱ्या कसोटीसाठी संघात परतला आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या तीन वन डे सामन्यांच्या मालिकेलाही अय्यरला मुकावे लागले होते. नागपूर कसोटीत अय्यरच्या अनुपस्थितीत सूर्यकुमार यादवने कसोटीत पदार्पण केले होते. मात्र आता श्रेयस अय्यरची प्लेइंग इलेव्हनमधील जागा निश्चित मानली जात आहे.

### सामना कधी कुठे कसा?

»भारत- ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा कसोटी सामना १७ फेब्रुवारी रोजी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडीयमवर खेळवला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार सकाळी ९.३० पासून सुरू होईल. सामन्याच्या अर्धा तास आधी म्हणजेच ९ वाजता नाणेफेक होईल. थेट प्रसारण स्टार स्पोर्ट्स आणि हॉटस्टारवर पाहता येईल.

# लाडक्या राहुलची होणार उचलबांगडी!

## रणजी द्विशतक ठोकणारा धाकड फलंदाज येणार संघात?

।दुबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सध्या चार सामन्याची बॉर्डर गावसकर मालिका खेळल्या जात आहे. टीम इंडियाने मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली असली तरी केएल राहुल त्याच्या खराब कामगिरीमुळे संघासाठी डोकेदुखी बनला आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील चार सामन्यांच्या बॉर्डर गावसकर कसोटी मालिकेतील शेवटच्या दोन कसोटी सामन्यांसाठी लवकरच टीम इंडियाची घोषणा केली जाऊ शकते. शेवटचे दोन कसोटी सामने इंदूर आणि अहमदाबाद येथे होणार आहेत.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटी सामन्यात केएल राहुलचा पत्ता कट होऊ शकतो. टीम इंडियामध्ये त्याच्याच खास मित्राची एन्ट्री होणार आहे. हा खेळाडू अतिशय धोकादायक असून या खेळाडूच्या एंट्रीची बातमी ऐकल्यानंतर ऑस्ट्रेलियन संघात घबराट पसरली आहे.



### शेवटच्या 2 कसोटी सामन्यांमध्ये भारतीय संघ असा ...

» रोहित शर्मा (कर्णधार), मयंक अग्रवाल, शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, केएस भरत (विकेटकीपर), इशान किशन (विकेटकीपर), सरफराज खान, आर अश्विन, अक्षर पटेल, कुलदीप यादव, रवींद्र जडेजा, मोहम्मद शमी , मोहम्मद सिराज, उमेश यादव, जयदेव उनाडकट.

टीम इंडियामध्ये केएल राहुलच्या स्थानावर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. केएल राहुलच्या खराब कामगिरीमुळे टीम इंडियाचे मोठे नुकसान होत आहे.

नागपुरातील पहिल्या कसोटीत टीम इंडियाला केएल राहुलकडून मोठ्या शतकाची अपेक्षा होती, मात्र तो केवळ 20 धावा करून बाद झाला. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या दोन कसोटी सामने आणि एकदिवसीय मालिकेसाठी बीसीसीआय लवकरच भारतीय कसोटी संघाची घोषणा करू शकते. खराब कामगिरी पाहता केएल राहुलचा पत्ता कट होऊ शकतो. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या दोन कसोटी सामन्यांसाठी सलामीवीर मयंक अग्रवाललाही संधी मिळू शकते. मयंक अग्रवालने रणजी सेमीफायनल सामन्यात द्विशतक झळकावले आहे. या सामन्याच्या पहिल्या डावात मयंक अग्रवालने 249 धावांची स्फोटक खेळी केली.

रणजी ट्रॉफीच्या चालू मोसमात कर्नाटककडून खेळणाऱ्या मयंक अग्रवालने 9 सामन्यांच्या 13 डावांमध्ये 82.50 च्या सरासरीने 990 धावा केल्या आहेत, ज्यामध्ये त्याने तीन शतके आणि सहा अर्धशतके झळकावली आहेत.

अशा परिस्थितीत केएल राहुलला कसोटी संघातून वगळले जाऊ शकते आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या दोन कसोटीत मयंक अग्रवालला सलामी केल्या जाऊ शकते.

# सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूला संधी मिळणे योग्यच!

। नवी दिल्ली । महाईन्यूज
। वृत्तसंस्था ।



मी माझी सर्वोत्तम कामगिरी केली. मात्र, एखादा खेळाडू माझ्यापेक्षाही उत्तम कामगिरी करत असल्यास त्याला संधी मिळणे योग्यच आहे. परंतु भारतीय संघात पुनरागमनासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे, असे विधान अनुभवी सलामीवीर शिखर धवनने केले. धवनला गेल्या काही काळात धावांसाठी झगडावे लागले आहे. तर दुसरीकडे शुभमन गिलने सलामीला मिळालेल्या संधीचे सोने केल्यामुळे ३७ वर्षीय धवनने भारतीय एकदिवसीय संघातील स्थान गमावले. “चढ-उतार हा आयुष्याचा भाग आहे. वेळ आणि अनुभवानुसार तुम्ही अपयश पचवायला शिकता. मी नेहमीच माझी सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, एखादा खेळाडू माझ्यापेक्षाही उत्तम कामगिरी करत असल्यास त्याला संधी मिळणे योग्यच आहे. मी आयुष्यात आणि कारकीर्दीत ज्या टप्प्यावर आहे, त्याबाबत खूप समाधानी आहे.

भारतीय संघात पुनरागमनासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. मला संधी मिळाली तर त्याचा खूप आनंद असेल, पण संधी न मिळाल्यासही मी फार निराश होणार नाही,” असे धवन म्हणाला.

### योग्य खेळाडूस संधी मिळावी...

» “चढ-उतार हा आयुष्याचा भाग आहे. वेळ आणि अनुभवानुसार तुम्ही अपयश पचवायला शिकता. मी नेहमीच माझी सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, एखादा खेळाडू माझ्यापेक्षाही उत्तम कामगिरी करत असल्यास त्याला संधी मिळणे योग्यच आहे.